जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -८२ दिनांक - ०१/०२/२०२५**

लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर

## खुनाचे गुन्हयातील आरोपीला मा.जिल्हा सत्र न्यायालयाने दिली जन्मठेपेची शिक्षा

लोणी काळभोर पोलीस ठाणेकडील गु.र. नं.३९९/२०२४ भां.दं.वि.क. ३०२ मधील आरोपी सचिन अंबादास खोत वय २७ रा.उरुळी कांचन,ता. हवेली, जि.पुणे याने दि. २९/१०/२०१४ रोजी त्याचे वडील अंबादास दिगांबर खोत वय ५२ वर्षे रा.सदर यांचा लोखंडी कोयत्याने खुन केला होता. मयत इसम हे आरोपीचे वडील असुन त्यांची आरोपीची पत्नी हिचेवर वाईट नजर होती, ते नेहमी आरोपीचे पत्नी समोर फिरायचे व तीचा हात धरुन तीला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करायचे. दि. २९/१०/२०१४ रोजी अंबादास खोत हे जेवण करत असाताना आरोपी त्याचे वडीलांना आपण रात्री शेतात पाणी द्यायला जावु असे म्हणाला. त्यावर त्याचे वडील अंबदास खोत आरोपीस म्हणाले तु शेतात पाणी द्यायला जा मी पिडीत महिलेसोबत झोपतो असे म्हणाले. त्यांचे बोलण्याचा राग आल्याने आरोपीने उस तोडण्याचे लोखंडी कोयत्याने त्याचे वडील अंबादास खोत यांचा खुन केला. सदर बाबत लोणी काळभोर पोलीस ठाणेस वरिलप्रमाणे गुन्हा नोंद होता.

सदर गुन्हयाचा सहा. पोलीस निरीक्षक श्री रणजितसिंग यांनी सखोल तपास करुन सबळ पुराव्याअंती आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखलकेले होते. त्याचा सेशन केसनंबर १०९/२०१५ असा होता. मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री पी. पी.जाधवकोर्ट यांनी सदर केसचे सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान अतिरीक्त सरकारी वकील श्री नामदेव तरळगट्टी यांनी सरकार पक्षातर्फे बाजु मांडली.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, श्री. मनोज पाटील,मा.पोलीसउप आयुक्त,परिमंडळ ०५, डॉ. राजकुमार शिंदे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, श्रीमती अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे महिला पोलीस अंमलदार ललीता कानवडे यांनी सदर केसचे कोर्ट पैरवी म्हणुन कामकाज पाहुन सर्व साक्षी पुरावे विहीत वेळेत योजनाबध्दरित्या हजर केले. त्यामुळे सदर केसचे सुनावणी अंती मा.न्यायालयाने आरोपीस भादवि कलम ३०२ अन्वेय जन्मठेप व २५ हजार रुपयेदंड, दंडन भरल्यास तीन महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.